Visit us on www.mahapwd.com

किमंत रु. २०/-

महाराष्ट्र शासन,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विषेश प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव (पूर्व), मुंबई. ४०० ०६५



# नागरिकांची सनद
# २०१२

## CITIZENS CHARTERS
## 2012

# नागरिकांची सनद

# २०१२

## *महाराष्ट्र शासन ,*

*कार्यकारी अभियंता,*
*सार्वजनिक बांधकाम विषेश प्रकल्प विभाग ,*
*आरे, गोरेगाव (पूर्व), मुंबई. ४०० ०६५*

# सूची


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते २ |
| २ | विभागाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी | ३ ते ४ |
| ३ | विभागाची  रचना | ४ |
| ४ | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ५ |
| ५ | विभागांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजीकरण | ६ |
| ६ | वाहतूकीस सुरक्षित रस्ते | ७ |
| ७ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी, | ७ते ८ |
| ८ | सनदेची अंमलबजावणी | ९ |
| ९ | परिशिष्टे (अ, ब, क) | ११ ते १७ |

# १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बाधकाम विभाग हा सुमारे १५० वर्षाहून जास्त अशी गौरवशाली परंपरा असलेला महत्वाचा विभाग आहे. सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभअग, आरे, गोरेगाव (पूर्व), मुंबई ६५ नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. ही बांधीलकी सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव (पूर्व), मुंबई ६५, या सनदेद्वारे जाहीर करीत असून, ती स्विकारीत आहे. सार्वजनिक सेवा तत्परने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामयिक प्रश्न सहानभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टिकोन ही सनद तयार करताना नजरेसमोर ठेवला आहे.

१) शासकीय ईमारतींची ( कार्यालयीन तसेच निवासी गाळे ) नविन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक, सुविधायुक्त, सौंदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करणारी अशी करणे.

२) इमारती, रस्ते व पुलांची नियतकालिक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणाया निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

३) इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे.

४) आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियंत्रिकीशी संबंधीत आवश्यत ती कामे करणे व मदत करणे.

५) सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

६) ठेकेदारांची प्रमाणपत्रे व विविध ना हरकतीने दाखले विहीत कालावधीत निर्गमित करणे.

७) सर्व विषयाची अनुसूची तयार करणे व निपटारा करण्याचा विहित कालावधी ठरविणे.

८) सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्यें व जबाबदाऱ्या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.

९) प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावी पणे निराकरण करणे.

१०) माहितीचा अधिकार अधिनियम, अंतर्गत मागितलेली माहिती संबधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे.

११) विभागाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून विभागाची लोकभिमुखता वाढविणे

१२) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

१३) संगणकीकरणाबाबत सर्व विभागीय कार्यालये, प्रादेशिक कार्यालये, तसेच मंत्रालय, यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे. विभागाची विविध माहिती www.mahapwd.com या वेबसाईटवर अद्यावत करणे.

१४ कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख्यासह नोंदवहीसह अद्यावत करणे

२. **सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव (पूर्व), मुंबई ६५ या कार्यालयची बांधिलकी, व नागरिकांची जबाबदारी :**

**बांधिलकी**

(अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

(ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाचा वेळेत निपटारा करेल.

(क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील. यासाठी वेळोवेळी विविध प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

**नागरिकांची जबाबदारी**

- शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकाचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा .
- विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्राह धरु नये.

- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
  नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

- रस्त्यांच्या दोन्ही बाजूला असणाया वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.

- नागरीकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

- नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मकता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्यची भावना ठेवावी.

**३. सा.बां. विशेष प्रकल्प विभाग आरे कार्यालयाची रचना**

कार्यकारी अभियंता, यांचे अधिपत्याखाली चार उप अभियंता आहेत.

शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णय, विभागाचा अर्थसंकल्प, शासकीय इमारती, रस्ते, पूल, धरण व कोळंबी प्रकल्प यांचे बांधकाम (मूळ काम) देखभाल /दुरुस्ती, इत्यादी बाबी हाताळल्या जातात. या विभागाअंर्तगत चार उपविभाग असून त्याचा सोबत वृक्ष तक्ता जोडला आहे

**(परिशिष्ट - अ)**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इ. काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते.

४. **सा. बां. विशेष प्रकल्प विभाग आरे यांचे कार्यक्षेत्र या विभागाचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहे :**

या विभागाचे कार्यक्षेत्रामध्ये आरे दुग्धवसाहतीमधील मध्यवर्ती दुग्धशाळा, प्रशासकीय इमारत, सर्व शासकीय निवासस्थाने, आरे रुग्णालय, न्ययझीलंड हॉस्टेल, दुध विज्ञान संस्था,अंतर्गत रस्ते व मुख्यरस्ता, पाणीपुरवठा योजना, आरे मत्स्यबीज केंद्र, इत्यादीची दुरुस्ती देखभाल करण्याचे काम, आरे दुग्धवसाहतीच्या सरहदीवार संरक्षण भिंत बांधुन, संजय गांधी राष्ट्रीय उदयान, बोरिवलीमध्ये वन सरहदीवार संरक्षक भित बांधणे,वन्य प्राण्यांसाठीअंपगालयाचे बांधकाम करणे व निरीक्षण मनोरे बांधणे,कामगार आयुवते कार्यालयासी वांद्रे कुर्ला संकल्प येथे प्रशासकीय इमारती बांधणे इत्यादी मुळे कामे करणे. दापचरी येथील कोळंबी प्रकल्पाची, सर्व शासकीय निवासस्थाने व इमारती, कूर्झे धरणाची तसेच अंतर्गत रस्त्यांची दूरुस्ती देखभालीची कामे सर्व कामे करण्यात येतात. या व्यतिरीक्त पुढील कामे प्रस्तावित आहेत

१. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे प्रशासकीय इमारत बांधणे. २. पालघर येथे गोरेगांव येथील गुरांचा बाजार स्थलांतरीत करणे. ३. बोरीवली, मालवणी येथे अस्तित्वातील औद्योगीक प्रशिक्षण संस्था येथे तळमजला + चार ची सेंटर ऑफ एक्सलन्स ची इमारत

बांधणे. ४. बांद्रा (पश्चिम) येथे पोलीस विभागासाठी प्रशासकीय इमारत बांधणे. ५. आरे येथील गुणनियंत्रण प्रयोगशाळेची जी.एल.पी./जी एम.पी नुसार सुधारणा करणे. ६. ठक्कर बाप्पा योजने अंर्तगत आरे दुग्धवसाहाततील आदिवासी पाडयांवर नागरी सुविधा पुरविणे. ७. निमखारे कोळंबी प्रकल्प, रत्नगिरी यांची दुरुस्ती करणे. इत्यादी मुळ कामे करणे.

**५. विभागांतर्गत कार्यपूर्तीस वेळापत्रक, माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे :**

**(अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक**

ठेकेदारांची विविध ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी,त्यास सक्षम अधिकारी इ.ची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट - ब) नमुद केली आहे. अर्जाचा विहीत नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहीत फी भरुन संबंधीत विभागीय कार्यालयात मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती , कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ.उद्भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**(ब) माहितीची सुलभता**

विभागाच्या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन), तसेच वेळोवेळी प्रसिध्द केल्या जाणाया पत्रकांव्दारे जनतेला आकड़ेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध होईल.

**(क) खाजगीकारण**

विशेषत: शहरी भागाच्या विकास कामासाठी अर्थसंकल्पातून उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग,बांधा,वापरा व हस्तांतरीत करा, या तत्त्वावर सुरू केला आहे.

६. **वाहतूकीस सूरक्षित रस्ते**

विभागाने रस्त्यांची सूरक्षितता वाढ़विण्यासाठी "अपघात निवारण समिती" स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचचिवलेल्या स्थळांची सुधारणा टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येते. तपशिलवार व आवश्यक असे माहितीफलक रस्त्यावर लावले जातील, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

७. **गाऱ्हाण्यांचे निराकारन , सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी**

**(अ) गाऱ्हाणी/तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे /तक्रार असेल त्या कार्यालयांच्यां वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकड़े तक्रार नोंदवावी म्हणजे उदा. उप विभाग कार्यालयाच्या विरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास विभाग कार्यालय प्रमुखाकड़े म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकड़े गाऱ्हाणे मांड़ावे. विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/तक्रार असल्यास मंड़ळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्याकड़े गाऱ्हाने मांड़ावे. अशा गाऱ्हाणे/तक्रारीचे निराकरण वरिष्ट कार्यालयाकाडून ७ दिवसात करण्यांत येईल. गाऱ्हाणे/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यात येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ई मेल व्दारेही नागरिक मांडू शकतात.

**(ब) नागगिरकांच्या सनदेचा आढ़ावा/सिंहावलोकन**

या नागगिरकांच्या सनदेच्या उपयुवततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढ़ावा सा.बा.विभाागाकड्डुन घेण्यात येईल.

**(क) जनसामान्यांड्डुन सुचना**

ही नागगिरकांची सनद सर्वसामान्य नागगिरकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागगिरकांच्या बहुमूल्यसुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन,त्यात वेळोवेळी सूधारना घड़वून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वत:हून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सा.बा. विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरीकांना जादा हक्क मांड़ण्यासाठी मदत करते.

## ८. <u>नागगिरकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

सा.बा.विभागाच्या या नागगिरकांच्या सनदेची अंमलबजावणी दिनांक १५/८/२००५ पासून करण्यास मंडळ व विभाग कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन, नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील  व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

सा.बा.विभाग खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुररिवण्याची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहितीसाठी नागगिरकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकभिमुख, सुलभ़ व आटोपशीर करण्यासाठी   नागगिरकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टचारास आळा घालण्यात येईल.तसेच नागगिरकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

# परिशिष्ठे

| | |
|---|---|
| (अ) | मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तत्का |
| (ब) | कार्यपूर्तीचे वेळापत्रक |
| (क) | कार्यक्षत्राचा नकाशा |

# *परिशिष्ट - अ*

## <u>सा.बा.विशेष प्रकल्प विभाग, आरे, मुबंई</u>

## <u>वृक्ष तत्का</u>

कार्यकारी अभियंता, सा.बा.विशेष प्रकल्प विभाग,
आरे,मुबंई

- उपपिवभागीय अभियंता<br>कृ.बां.उ.वि.क्र.१,<br>आरे,मुबंई.
- उपपिवभागीय अभियंता,<br>सा.बा.उपपिवभग,चेंबूर,<br>मुख्यालय बांद्रा,मुबंई ५१
- उप अभियंता,<br>कृ.बां.उ.वि.क्र.९,<br>(कालवे)दापचरी
- उप अभियंता,<br>कृ.बा.उ.वि.क्र.१३,<br>आरे,मुबंई.

# परिशिष्ट ब

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा समक्ष अधिकारी | कालावधी मर्यादा कार्यपर्तीचा |
|---|---|---|---|
| १. | कंत्राटदाराने काम पूर्ण केल्याचा दाखला /प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |

टिप :- सदरचे अर्ज कार्यकारी अभियंता यांचेकड़े स्विकारण्यांत येतात.

# परिशिष्टे क

सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग आरे,
यांचा कार्यकक्षा दर्शविणरा नकाशा

- आरे दुग्धशाळा
- प्रशासकीय इमारत वांद्रे
- न्यायालय व सहा. पोलीस आयुवत कार्यलय, व निवासस्थान अधेरी
- दुग्धप्रकल्प दापचरी जि. ठाणे
- मत्स्यव्यवसाय पालघर
- शितकरण केंद्र सरळगांव
- दुग्धशाळा गोवे
- गुरांचा दवाखाना भिंवड़ी जि. 'ठाणे

